**दिवाणी चौकशी अर्ज क्र.३६/२०२२ मध्ये नि.क्र.१ वरील आदेश.**

**अनुराधा पांडुरंग पागीरे–२.**

**वि.**

**सुमन दगडु पागीरे.**

(सीएनआर क्र. **MHTH** 13000–584–2022.)

०१. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट खाली वारस दाखला मिळणेकरीता दाखल केलेले आहे.

०२. अर्जदार यांचे थोडक्यात म्हणणे असे की, अर्जदार क्र.१ यांचे पती, अर्जदार क्र.२ व ३ चे वडील पांडुरंग दगडु पागीरे हे दिनांक २३/०४/२०२१ रोजी अहमदनगर येथील इंदुमती हॉस्पीटल येथे अल्पशा आजारपणामुळे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ यांनी अर्जदार क्र.२ व ३ हे अज्ञान असल्याचे कथन करुन अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र.१ या स्वतः असल्याचे कथन केले आहे. अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे पती पांडुरंग दगडु पागीरे यांच्या नावे असलेली प्रादेशिक परिवहन कार्यालय पेण यांच्याकडील नोंदणीकृत असलेली मारुती कंपनीची मारुती स्वीफ्ट व्हीएक्सआय बीएसआयव्ही नोंदणी क्र. एम एच ०६ बी यु १४०३ ही त्यांचे नावे होण्याकरीता व अर्जदार हे वारस असल्याने त्यांच्या नावे वारस दाखला मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल करुन मंजूर करण्याची विनंती केलेली आहे. तसेच अर्जदार यांनी वारस दाखला मिळण्यासाठी अन्य न्यायालयात

अर्ज दाखल केला नसल्याचे कथन केले आहे.

०३.        सदर अर्जाकामी सामनेवाला यांना नोटीसची बजावणी होवून देखील त्या हजर न झाल्यामुळे त्यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आला.

०४.        या अर्जाच्या कामी अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या पुराव्या दाखल साक्षीदार क्र.१ म्हणून अर्जदार यांचे नि.क्र.१३ कडे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

०५.        अर्जदार यांनी पांडुरंग दगडु पागीरे हे दिनांक २३/०४/२०२१ रोजी मयत झाल्याबाबत त्यांच्या मृत्यूच्या दाखल्याची प्रमाणित प्रत नि.क्र.१४ कडे दाखल केली आहे. अर्जदार क्र.१ ते ३ यांनी त्यांच्या आधारकार्डच्या प्रमाणित प्रती अनुक्रमे नि.क्र.१५ ते १७ कडे दाखल केल्या आहेत. अर्जदार यांनी आर टी ओ कार्यालय पेण यांचेकडील नोंदणी पुस्तीकाची (आर सी बुक) प्रमाणित प्रत नि.क्र.१८ कडे दाखल केली आहे. अर्जदार यांनी दिनांक १७/११/२०२२ रोजीच्या दैनिक रायगडचा आवाज या वृत्तपत्रामध्ये मयत पांडुरंग दगडु पागीरे यांच्या मृत्यू बाबत नि.क्र.१९ ची नोटीस प्रसिध्द केली. सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या कालावधीमध्ये

न्यायालयात कोणीही हरकत उपस्थित केली नाही. अर्जदार यांनी नि.क्र.२० ला पुरशिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केलेला आहे.

०६. अर्जदाराच्या पुराव्यानुसार अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत पांडुरंग दगडु पागीरे यांचे कायदेशीर वारस होय. त्यांच्या पुराव्यावरुन व हिंदु वारसा कायदयातील तरतुदी विचारात घेवून असे निदर्शनास येते की, मयत पांडुरंग दगडु पागीरे यांचे वारस म्हणून अर्जदार क्र.१ अनुराधा पांडुरंग पागीरे पत्नी, अर्जदार क्र.२ कृष्णा पांडुरंग पागीरे मुलगा आणि अर्जदार क्र.३ ज्ञानेश्वरी पांडुरंग पागीरे मुलगी म्हणून कायदेशीर वारस आहेत. तसेच अर्जदार क्र.२ व ३ हे अज्ञान असल्यामुळे अ.पा.क. म्हणून अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

:: **आदेश** ::

०१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

०२. अर्जदार क्र.१ अनुराधा पांडुरंग पागीरे यांचे नावे मारुती स्वीफ्ट व्हीएक्सआय बीएसआयव्ही नोंदणी क्र. एम एच ०६ बी यु १४०३ या वाहनांकरीता वारस दाखला देण्यात यावा.

०३. अर्जदार यांनी न्यायालयीन मुद्रांक भरल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Sonali Dilip Javalgekar
Digitally signed by Sonali Dilip Javalgekar
Date: 2023.04.17 17:20:56 +0530

श्रीवर्धन. ( एस. डी. जवळगेकर )
दिनांक – १७/०४/२०२३. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, श्रीवर्धन.

..